**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २४/२०१२ मधील नि.क्र. ४६ वरील आदेश.**
**अरूण एरंडकर -विरुध्द- श्रीरंग जाधव व इतर**
**आदेश पारित दिनांक ०७.०७.२०२३**

---

अर्जदार यांनी प्रस्तूतचा अर्ज मयत जाबदेणार क्र. १ श्रीरंग बापू जाधव यांचे वारस मुदतीत अभिलेखावर न घेतल्यामुळे झालेला उशीर माफ करणेसाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जासहीत अर्जदार अरुण बबन एरंडकर यांचे निशाणी क्र. ४७ वर सत्यप्रतिज्ञापत्र अभिलेखावर दाखल केले आहे.

**०२.** प्रस्तूत अर्जात अर्जदारचे असे कथन आहे की, सदरचे प्रकरण चालू असताना या दाव्यातील जाबदेणार क्र. १ श्रीरंग बापू जाधव हे दिनांक ०५.०८.२०१६ रोजी मयत झाले आहेत. सदर दाव्याचा निकाल गुणदोषावर होणेकरिता सदर मयत जाबदेणार क्र. १ यांचे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक होते. परंतु, सदर जाबदेणार यांचे विधिज्ञांनी जाबदेणार क्र. १ हे मयत झाल्याची माहिती मे. न्यायालयाच्या निदर्शनास मुदतीमध्ये आणून दिली नाही. त्यामुळे मयत जाबदेणार क्र. १ यांचे कायदेशीर वारस रेकॉर्डवर घेण्यास विलंब झाला. त्यामुळे अर्जदारने मयत जाबदेणार क्र. १ श्रीरंग जाधव यांचे वारस अभिलेखावर घेणेस झालेला उशीर माफ होवून मिळावा, ही विनंती केली आहे.

**०३.** सदरकामी, जाबदेणार क्र. ९ व १० तर्फे हे म्हणणे दाखल केले आहे की, सदरील अर्जामध्ये किती उशीर झाला हे नमूद नाही. तब्बल ३ वर्षांचा उशीर वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला आहे. तो योग्य नाही. सबब, सदरकामी अर्ज फेटाळणेत यावा.

**०४.** अर्जदारचे प्रस्तूत अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, जाबदेणार क्र. १ श्रीरंग बापू जाधव हे दिनांक ०५.०८.२०१६ रोजी मयत झाले आहेत. मयत जाबदेणार क्र. १ श्रीरंग जाधव यांचे वारस अभिलेखावर घेतल्यामुळे दाव्याचा अंतिम निकाल गुणदोषावर देणेकरिता मदत होणार आहे. तसेच अर्जदार व जाबदेणार यांच्यामधील वादाचा अंतिम निकाल होणेकरिता मयत जाबदेणार क्र. १ यांच्या वारसांची नावे अभिलेखावर येणे गरजेचे आहे. मयत जाबदेणार क्र. १ यांच्या वारसांची नावे विहित वेळेत अभिलेखावर घेतले नसल्याचे संयुक्तीक कारण अर्जात नमूद केले आहे. परंतू, प्रस्तूत मयत जाबदेणार क्र. १ श्रीरंग बापू जाधव यांचे वारस रेकॉर्डवर घेणेकरिता उशीर झाल्यामुळे सदर

प्रकरण लांबणीवर पडलेले आहे. त्यामुळे अर्जदारास सदर विलंबाकरिता कॉस्टची आकारणी करणे हे नैसर्गिक न्याय तत्वाच्या दृष्टीने योग्य होणार आहे. तरी खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्जदार यांचा निशाणी क्र. ४६ चा अर्ज रक्कम रुपये ५००/- (अक्षरी रक्कम रुपये पाचशे फक्त) इतक्या कॉस्टच्या आकारणीवर मंजूर करण्यात येतो. सदर कॉस्टची रक्कम तालुका विधी सेवा समिती, खंडाळा येथे जमा करावी. |
| २. | मयत जाबदेणार क्र. १ श्रीरंग बापू जाधव यांचे वारस मुदतीत अभिलेखावर घेण्यास झालेला उशीर माफ करण्यात येतो. |
| ३. | सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी. |

(अ. क. दामटे)
दिनांकः- ०७.०७.२०२३ दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, खंडाळा.